**<u>वादीतर्फे उर्वरीत उलटतपास श्री. व्ही.एस.शेळके, वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

**५७.** मुकूंद हडबे यांना मी ओळखतो, तो वादी क्र.१ कडे चालक होता. सुग्रीव देपे हा माझा चुलत भाऊ आहे, तो काय करतो हे मला माहित नाही. बापु जाधव, सतीश सोनवणे, संतोष खैरनार आणि समाधान सावकार यांच्या माझी दुश्मनी नाही, मी त्यांना ओळखत नाही. जयसिंगपूर येथील तानाजी पाटील यांना मी ओळखत नाही. कोठारी अग्रोटेक प्रा.लि. सोलापूर यांच्याकडे मी खरेदी-विक्रीचा व्यवहार केलेला नाही. विजय चितकोटे यांच्याकडे माझा खरेदी-विक्रीचा व्यवहार झालेला नाही. हैद्राबादच्या कुरेशी यांच्याशी माझा फळविक्रीचा व्यवहार झालेला नाही. नवी दिल्ली येथील राणा फ्रुट्स कमीशन एजंट यांच्याशी माझा व्यवहार झालेला नाही. बळीराम देपेसोबत माझे जागेवरुन भांडण आहे. वामन पलमाटे, भानूदास देपे, बालाजी देपे यांच्याशी माझे वैरत्व नाही. मी कोपरा गावचा उपसरपंच म्हणून २०१२ ते २०१७ या काळात काम केले आहे. वादी क्र.१ याने शेतीउपयोगी साहित्याच्या केलेल्या खरेदीबद्दल माझा आक्षेप नाही. वादीकडे जे.सी.बी. ऑपरेटर म्हणून राम क्षिरसागर होता. वादीकडे आजही स्वत:चे ट्रॅक्टर आहे याची मला माहिती नाही. पुर्वी वादीकडे ट्रॅक्टर होते. हे खरे नाही की, वादीकडे पुर्वी ६ ते ८ बैल, १०-१५ म्हशी, १०-१५ गाई असा जामानिमा होता. वादीकडे डाळींब व कांदा वाहतुकीसाठी स्वत:ची ट्रक होती हे मला माहित नाही. वादीकडे दररोज ५०-६० महिला डाळींब आणि कांद्याच्या पीकात काम करीत हे मला माहिती नाही. वादीकडे सालगडी १० ते १५ संख्येने होते, हे म्हणणे खरे नाही.

**५८.** हे खरे नाही की, माझ्या वडिलांचे कोपरा बस स्टॅण्डजवळ चहाचे दुकान होते. हे खरे की, माझे वडील मृत्युपुर्वी कॅन्सर रोगाने आजारी

होते. हे खरे नाही की, माझ्या वडिलांवर आम्ही भाऊ-बहिणी यांचा कौटुंबिक भार १९८४ सालापासून होता. आमच्या कुंटूंबाचा सगळा खर्च वादी क्र.१ भागवित हे खरे नाही. हे खरे नाही की, आमच्या कुंटूंबाकडे येणारी खंडाची रक्कम वादी क्र.१ देत होता. हे खरे नाही की, माझी बहिण भाग्यशाला हिच्या लग्नाचा खर्च करण्याचे वादीने कबुल केले, मात्र केला नाही. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्याकडे मासीक किंवा वार्षीक उत्पन्नाचा कोणताही आधार नव्हता, हे खरे नाही. हे खरे नाही की, लोखंडी पाईप, पाण्याच्या मोटर वगैरे वस्तु आजअखेर मी कधीही खरेदी केल्या नाहीत. हा दावा वाचून झाल्यावर मी बनावटी पावत्या दाखल केल्या हे खरे नाही. वाद मिळकतीत मी स्वत: कुपनलिका घेतलेली नाही किंवा पाईपलाईन केली नाही, हे खरे नाही. २००७ सालापर्यंत माझ्या घरी शेती अवजारे, गडीमाणसे नव्हती, हे म्हणणे खरे नाही. मला गंगाधर यांचे घर, पटागंण माहिती आहे. हे खरे की, अहमदपूर-अंबाजोगाई राज्य मार्गाच्या पश्चिमेला त्यांचे घर, अंगण व शेती आहे. हे खरे नाही की, माझे घर जून्या वसाहतीत असून शेती या राज्य मार्गाच्या उत्तरेला आहे. हे खरे नाही की, यांत्रीकी शेतीचा पहिला प्रयोग अहमदपूर तालुक्यात वादीने केला. हे खरे की, संपुर्ण वाद मिळकतीत पावसाचे पडणारे पाणी नदीला निघून जावे म्हणून जमिनीखाली बंदीस्त नाल्या आहेत. हे खरे नाही की, या सगळया नाल्या वादी क्र.१ ने बांधल्या आहेत. हे खरे नाही की, वाद मिळकतीचा विकास करण्यासाठी वादीची आर्थीक व मनुष्यबळाची ताकद होती. हे खरे नाही की, माझ्याकडे मनुष्यबळ ही नव्हते व आर्थीक ताकदही नव्हती. हे खरे नाही की, माझे वडील व्यसनी होते. हे खरे नाही की, माझ्या वडिलांनी त्यांच्या हयातीत शेती कधीही पाहिली नाही किंवा तिची मशागत केली नाही. हे खरे नाही की, माझ्यासोबत कोपरा गावात माझ्या विचाराचे मला १०-१५ मित्र आहेत. हे खरे नाही की, वादी क्र.१ याला आम्ही धमक्या

देतो व त्याच्यावर दहशत माजवतो. वादी क्र.३ पुण्यात व वादी क्र.४ हैद्राबादला राहतात हे मला माहिती नाही.

**५९.** माझ्या सरतपासातील वाद मिळकतीच्या चतु:सीमा निराधार आहेत हे खरे नाही. फेरफार क्र.३५६ च्या आधारे केलेले दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे आहे, हे म्हणणे खरे नाही. दावा परिच्छेद क्र.१४ मध्ये नमूद प्रापर्टी कोणाच्या कब्जात आहे, हे मला बघून सांगता येईल. स.क्र.५,६ व ८ मध्ये असलेल्या डाळींबाच्या लागवडीपासून विक्रीपर्यंतचा सगळा खर्च खंड पध्दतीने वादीने केला व त्याचे उत्पन्नही वादीनेच घेतले, हे म्हणणे खरे नाही. स.क्र.७०, ७१, ५, ६,५/१, ५/२, ६/१, ८/१/१, ८/१/२, ९/२, ६९/२, ६९/१ हे वडिलोपार्जित आहेत. हे खरे नाही की, या मिळकतींमध्ये वादी क्र.१, प्रतिवादी क्र.१ आणि ६ यांचा हक्क आहे. हे खरे की, वादी क्र.१, प्रतिवादी क्र.१ व ६ हे अंतराम देपे यांचे वारस आहेत. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ ते ५ हे अंतराम व हरीबाई यांचे वारस नाहीत. हे खरे नाही की, माझे वडील हयात असल्याने वाद मिळकतीत मला हिस्सा मागता येत नाही. हे खरे नाही की, माझे वडील व चुलते यांच्यात वडिलोपार्जित मिळकतीच्या वाटण्या १९९३ साली झाल्या. हे खरे नाही की, त्या वाटपात दावा मिळकत वादी क्र.१ च्या वाटणीस आली. हे खरे नाही की, हा दावा दाखल करायचे कारण प्रतिवादी क्र.६ ने दाखल केलेला २०/२००८ हा दावा मागे घेतल्याने घडले आहे. हे खरे नाही की, हा दावा वादी क्र.१, प्रतिवादी क्र.१ व ६ यांच्यात घडलेल्या वस्तुस्थिती प्रमाणचा आहे. सन २०२० साली स.क्र.६ मध्ये वीज पुरवठा घेतलेला नाही. स.क्र.५, ६ व ८ मध्ये विहीरीची नोंद मी स्वत: घेतलेली नाही. मी सांगतो की, वडिलांनी स.क्र.६/१ मध्ये १९८९ साली ती नोंद घेतली. हे खरे नाही की, त्या विहिरीची खोली ८ फुटांवरुन अधिक नाही. हे खरे नाही की, ती बांधीव विहीर नसून निव्वळ खड्डा आहे. त्या

विहिरीच्या निरिक्षणासाठी कमीशन नेमावयाचे झाल्यास माझी हरकत राहणार नाही. डाळींब रोपाच्या खरेदीच्या पावत्या मी बनावट दाखल केल्या आहेत, हे खरे नाही. हे खरे नाही की, स.क्र.५, ६ व ८ किंवा इतर जमिनीत मी डाळींब पीकाची लागवड केली नाही किंवा विक्रीही केली नाही. माझे भाऊ तानाजी हे शिक्षक आहेत. मी डाळींब लागवडीसाठी गावातील संभाजी कामाळे, बब्रुवान जाधव, अनिल जाधव, बाळासाहेब सुर्यवंशी यांची मदत घेतली होती. हे खरे नाही की, त्या सगळयांचे वय माझ्याप्रमाणेच आहे. डाळींब लागवडीसाठी माझ्या भावाच्या पगाराखेरीज जमिनीतील उत्पन्न होते. डाळींब बागेच्या लागवडीत एक-एक वर्षाचे अंतर आहे. डाळींब लागवड जून आणि जानेवारी महिन्यात केली. त्याचे उत्पन्न २००६ च्या दिवाळीच्या महिन्यात मी विकले. दावा मिळकतीत संपुर्ण डाळींब लागवड होती हे खरे नाही. हे खरे नाही की, डाळींबाची लागवड मी केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, मी व माझी भावंडे यांच्या खात्यात २००४ ते २००७ या काळात एकरक्कमी रुपये २५,०००/- कधीही नव्हते. हे खरे नाही की, माझ्या वडिलांना बॅंकेचे कर्ज होते. हे खरे नाही की, मला आर्थीक पाठींबा असल्याबद्दलचा कागदोपत्री पुरावा दाव्यात नाही. हे खरे नाही की, वादीच्या दाव्याला शह बसावा म्हणून दुकानदारांशी संधान बांधून मी खोटया पावत्या तयार केल्या व दाखल केल्या.

**वादीतर्फे उलटतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र.६ साठी उलटतपास तहकुब करण्यात आला.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**

दिनांक:२५/०८/२०२५.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.